# महापुरुष-देवदेवतांचे नाव दिल्यास कारवाई

## पावसाळी अधिवेशनात कायदा करणार

बीअर-बार, परमिट रुम, मांसाहारी खाणावळ, लोकनाट्य कला केंद्र तसेच देशी दारू विक्री केंद्रांना नावे देण्यासाठी करण्यात येतो. त्यामुळे देवी-देवतांच्या नावांचा होणारा गैरवापर रोखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमरसिंह पंडित यांनी विधान परिषदेत लक्षवेधी उपस्थित केली होती. त्यावर उत्तर देताना बावनकुळे यांनी ही घोषणा केली. गुमस्ता आणि कामदार कायद्याअंतर्गत हा विषय येत असल्यामुळे तातडीने यावर बंधन टाकता येणार नाही. मात्र याबाबत कामगार विभाग, उत्पादन शुल्क विभाग तसेच दोन्ही सदनातल्या सदस्यांची बैठक घेण्यात येईल तसेच विधी आणि न्याय विभागाचे मत मागवून कायदा तयार करण्यात येईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

**विदेशी दारूच्या नावावरही आक्षेप**

डॉक्टर, टीचर्स अशा विदेशी मद्याच्या नावाला बंदी घालण्याबाबतची मागणीही या लक्षवेधी सुचनेच्या चर्चेदरम्यान करण्यात आली. यावर उत्तर देताना या संदर्भात अभ्यास करावा लागेल, असे बावनकुळे म्हणाले.

# बैलगाडा शर्यत सुरू होणार!

## पशुसंवर्धन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती

मुंबई, शुक्रवार (विशेष प्रतिनिधी) - सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बैलगाडा शर्यतीवर आलेली बंदी उठवण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. बैलगाडा शर्यत पुन्हा सुरू करण्यासंदर्भात सरकारने विधेयक तयार केले असून ते याच अधिवेशनात मांडले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी काल दिली.

जलिकट्टूला परवानगी मिळावी म्हणून तामिळनाडुतील सर्वसामान्य रस्त्यावर उतरले होते. तामिळनाडूत मोठे आंदोलन झाल्यानंतर जलिकट्टूला परवानगी मिळाली.

या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने पशुसंवर्धनमंत्री महादेव जानकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती नेमली आहे. बैलगाडा शर्यतीला परवानगी देण्याआधी न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अभ्यास करून तसेच प्राण्यांना क्रूर वागणूक मिळू नये, यासाठी ही उपसमिती सरकारला शिफारस करेल.

या समितीत तिघांचा समावेश आहे. ही समिती लवकरच आपला अहवाल सादर करणार असून पुढील आठवड्यात ५ एप्रिल २०१७ रोजी याबाबतचे विधेयक विधानसभेत सादर करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# हनिर्माण सोसायट्यांसाठी तरतूद करा - आशिष शेलार

निदर्शनाला आले आहेत. मुंबईमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी असलेले सध्याचे प्रचलित नियम मुंबईच्या बदलत्या स्वरुपाशी सुसंगत नाहीत. राज्याचा सहकार कायदा अधिनियम १९६० नुसार या संस्थांना कामकाज करावे लागते. मात्र, ते त्यांच्या सोयीचे नाही म्हणून या कायद्यात सुधारणा करणारे अशासकीय विधेयक आमदार आशिष शेलार यांनी मांडले आहे. ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर सर्वच गृहनिर्माण सोसायट्यांना दरवर्षी हिशेब तपासणी करून त्याचा अहवाल निबंधकाला सादर करण्याचे सक्तीचे करण्यात येत आहे. हे काम आर्थिक वर्ष संपण्याआधी करणेही बंधनकारक आहे. त्यासाठी सरकारने हिशेब तपासनीसांचे पॅनल तयार करण्यात आले असून एका ऑडिटरकडे २० सोसायट्यांचे काम काम करण्याचे सोपविण्यात आहे. मुंबईत सुमारे ३५ हजार गृहनिर्माण सोसायट्या असून त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑर्डरची संख्या पाहता हे काम वेळेत पूर्ण होत नाही. त्याचप्रमाणे नव्या सहकार कायद्याने सोसायट्यांची निवडणूक ही निबंधक कार्यालयामार्फत घेणे बंधनकारक करण्यात येत असली तरी त्याचीही अवस्था अशाच प्रकारे होणार आहे.

# लदार निलंबित

## परित्यक्ता, अनुदान प्रलंबित

या संबंधीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी दर महिन्याला बैठक घेणे नायब तहसिलादारांना बंधनकारक आहे. मात्र, या अधिकाऱ्याने तीन तीन महिने बैठक घेतली नसल्याचे निदर्शनाला आले. त्यामुळे या अधिकाऱ्याची विभागीय चौकशी करण्यात येईल, असे बडोले म्हणाले. मात्र, या उत्तरावर अनेक सदस्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे त्यांनीही बोलण्यासाठी हात वर केले. त्यावेळी विधानसभा तालुका अध्यक्ष योगेश सागर यांनी हस्तक्षेप करत हा प्रश्न गंभीर असून याबाबत सदस्यांचा अनुभव चांगला नसल्याचे स्पष्ट केले. आमदार त्यांना शासन निर्णय दाखवतात तरीही अधिकारी त्यावर कारवाई करत नाही, मासिक बैठक घेत नाही, ही अधिकाऱ्यांची मुजोरी आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर कारवाई आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. अखेर सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्यमंत्री राजकुमार बडोले यांनी ही नायब तहसिलदाराला निलंबित करण्यात येत असल्याची घोषणा केली. सोबतच समितीने ज्या दिवसापासून अर्जाला मंजुरी दिली त्या दिवसापासून लाभार्थ्याला भरपाई देण्यात येईल, असेही सांगितले.


**BHARAT SANCHAR NIGAM LIMITED**
(A Govt. of India Enterprise)
O/o, The DET OFC (MTCE), WTR, BSNL, PANVEL 410206

**NOTICE INVITING e-TENDER**

**NIT-** E-tender for SLA based OFC maintenance of 120 Kms in Mangaon-Mhasala-Srivardhan-Roha-Kolad section in OFC Panvel Division under DGMM, WTR, Thane up to 10/04/2017

**NIT-** E-tender for SLA based OFC maintenance of 115 Kms in Khopoli-Pen-Alibaug-Roha section in OFC Panvel Division under DGMM, WTR, Thane up to 17/04/2017

For details log on site **http://www.tenderwizard.com/BSNL** or **www.wtr.bsnl.co.in/tender.html**

DET OFC (MTCE), WTR
BSNL, Panvel

Regd. & Corporate office : Bharat Sanchar Bhavan, Harish Chandra Mathur Lane, Janpath, New Delhi-110001 (CIN) : U74899DL2000GOI107739



TATA

**TATA STEEL LIMITED**
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १० (१) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर निर्गमित करण्यात आलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबध्द नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सवरील व्याजाचे थकीत खालीलप्रमाणे आहे :

| नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (एनसीडीज्) | रोजीस नियत व्याज | व्याज देयाकरिताची नोंदीत तारीख |
|---|---|---|
| दिनांक २३ एप्रिल, २०१२ रोजीस वाटप एनसीडीज २% एकूण रु. १,५०० कोटी. (ISIN:INE081A08181) | २३ एप्रिल, २०१७ जे दि. २४ एप्रिल, २०१७ रोजीस देय | १८ एप्रिल, २०१७ |

मार्च 31, 2017
मुंबई

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम के
कंपनी सचिव

TATA STEEL